# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४००००१
दुरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२ २२६४११५०/५१, फॅक्स २२६९२१०२
तार - EDUTECH E-mail :- desk5@dte.org.in internet :- http://www.dte.org.in

क्र. ४(३)/आस्था/२०१०/३२८
दिनांक : 20 DEC 2010

प्रति,
सहसंचालक,
तंत्र शिक्षण,
विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,
अमरावती व नागपूर

विषय :शासकीय व अशासकीय अनुदानित अभियांत्रिकी, वास्तुशास्त्र,औषधनिर्माणशास्त्र व व्यवस्थापनशास्त्रातील पदवी व पदविका संस्थेतील अध्यापकांना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या शिफारशीस अनुसरून दि. ०१.०१.२००६ नंतर वेतनसंरचनेतील पुढील टप्पा तथा पुढील वेतनबँड लागू करण्यासाठी आवश्यक असलेल्या उजळणीवर्गाच्या अटीची पुर्ततेबाबत.......

संदर्भ : शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. एसपीसी २०१०/(३४/१०)/टीई २ , दिनांक २० ऑगस्ट, २०१०

महोदय,

संदर्भीन शासन निर्णयान्वये अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या शिफारशींस अनुसरून या संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय व अशासकीय अनुदानित पदवी व पदविका संस्थांतील शिक्षकांना सहावा वेतन आयोगाच्या धर्तीवर दि. ०१.०१.२००६ पासून सुधारीत वेतन संरचना लागू केली आहे. सदर सुधारीत वेतनसंरचनेस अनुसरून वेतनसंरचनेतील पुढील ॲकेडेमिक ग्रेड पे चा टप्पा तथा पुढील वेतनबँड लागू करतांना किमान २ आठवडा कालावधीचे २ ॲआयसीटी मान्यताप्राप्त उजळणी वर्ग व किमान १ आठवडा कालावधीचे २ टेक्युप पुरस्कृत उजळणी वर्गाचा निकष बंधनकारक केला आहे. म्हणून संदर्भीन शासन निर्णयातील सेवाकालावधी नुसार पुढील ॲकेडेमिक-ग्रेड-पे चा टप्पा तथा पुढील वेतनबँड देय असलेल्या अध्यापकांनी उजळणी वर्गाच्या निकषाची पुर्ततेबाबतची माहिती संकलीत करुन शासनास दि. २०.१२.२०१० रोजी ५.०० वाजेपर्यंत शासनास सादर करावाची आहे.

उपरोक्त परिच्छेदास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, आपल्या विभागाच्या अधिपत्याखालील शासकीय पदवी व पदविका संस्थेतील ज्या अध्यापकांना सेवाकालावधी या निकषास

अनुसरुन प्रथम दर्शनी वेतनसंरचनेतील पुढील ग्रेड पे चा टप्पा तथा पुढील वेतनबँड ज्या दिनांकास देय आहे त्या दिनांकास कोणते उजळणी वर्ग पुर्ण केले आहेत याबाबतची माहिती सोबतच्या विवरणपत्र अ मध्ये दुपारी ३.०० पर्यंत या संचालनालयास desk4@dte.org.in (पदवी विभाग व desk4a@dte.org.in (पदविका विभाग) या ई-मेल पत्त्यावर पाठविण्यात यावी. येथे असेही नमूद करण्यात येते की, सदरहु माहिती ISM-Devanagari मधील DVB-TTSurekh या फॉन्ट मध्ये तयार करुन पाठविण्यात यावी. त्याचप्रमाणे सदरहु माहितीच्या आधारे शासन स्तरावर धोरणात्मक निर्णय होण्याची शक्यता असून सदरहु माहिती संबंधित अध्यापकांच्या उजळणी वर्गाच्या प्रमाणपत्राच्या आधारे सादर करावी.

तसेच दि. ०१.०१.२००६ नंतर ज्या अध्यापकांना निवड श्रेणीमध्ये ३ वर्ष होत आहेत अशा अध्यापकांची माहिती सोबतच्या विवरणपत्र ब मध्ये सादर करावी.

(गु. स. ठाकरे)
प्र. सहसंचालक
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत,

१. संचालक, अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे व प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय कराड, अवसरी, जळगांव, औरंगाबाद, अमरावती व चंद्रपूर
त्यांना कळविण्यात येते की, त्यांनी सहसंचालक; तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय यांना सादर केलेल्या माहितीची प्रत desk4@dte.org.in या ईमेल पत्यावर दुपारी ३.०० पर्यंत या संचालनालयास सुध्दा पाठविण्यात यावी.

२. प्राचार्य, सर्व शासकीय तंत्रनिकेतने व तत्सम पदविका संस्था
त्यांना कळविण्यात येते की, त्यांनी सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय यांना सादर केलेल्या माहितीची प्रत desk4a@dte.org.in या ईमेल पत्यावर दुपारी ३.०० पर्यंत या संचालनालयास सुध्दा पाठविण्यात यावी.

जा.क्र.- विकापु/आस्था-२/माहिती/२०१०/ ११०८५ तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे:-४११०१६.
दिनांक:- 20 DEC 2010
कालमर्यादा:-२१-१२-२०१०.

सोबत संचालनालयाच्या संदर्भाधीन पत्राची छायापत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी. त्यांना कळविण्यांत येते की, संदर्भाधीन विषयाची आपले संस्थेची माहिती विहित प्रपत्रात दिनांक २१-१२-२०१० सकाळी ११.०० वाजेपर्यंत या कार्यालयास पाठवावी व सदर पत्राची विवरणपत्रसह प्रत मुख्य कार्यालयास सादर करावी.या प्रकरणी प्रथम प्राधान्याने कार्यवाही करावी.

(डी.एन.शिंगाडे)
प्र.सहसंचालक
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रती:- प्राचार्य/संचालक, अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/वास्तुशास्त्र/हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरिंग टेक्नॉलॉजी पदवी /पदवीका अभ्यासक्रम संस्था.

प्रत:- श्री. शिंदे प्रोग्रॅमर वि. क़ा. पुणे यांना माहितीसाठी त्यांना कळविण्यांत येते की, संदर्भाधिन पत्र,सहपत्रासह या कार्यालयाचे संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यांत यावे.

## विवरणपत्र अ

महाविद्यालय / संस्था :

| अ.क्र. | अध्यापकाचे नांव, पदनाम व संस्था | दि. ०१.०१.२००६ रोजीचा वेतनबँड व अेजीपी | सेवाकालावधीच्या निकषास अनुसरून प्रथम दर्शनी देय उच्च वेतनबँड तथा अेजीपी | स्तंभ क्र. ४ मधील उच्च वेतनबँड तथा अेजीपी देय असलेला दिनांक | अेआयसीटीई मान्यताप्राप्त किमान २ आठवडा कालावधीचे उजळणी वर्ग | टेक्युप पुरस्कृत किमान १ आठवडा कालवधीचे उजळणी वर्ग | डी.टी.ई / विद्यापीठ व एम.एस.बी.टी.ई मान्यताप्राप्त उजळणीवर्ग | राज्यातील स्वायत्त पदवी व पदविका संस्थांनी आयोजित केलेले उजळणी वर्ग | एमएचआरडी /केंद्रशासन पुरस्कृत उजळणी वर्ग | इतर उर्वरीत उजळणी वर्ग | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. | १२. |
| | | | | | | | | | | | |

संस्था प्रमुखांची सही व शिक्का

विवरणपत्र ब

महाविद्यालय / संस्था :

| अ.क्र. | अध्यापकांचे नांव, पदनाम व संस्था | निवड श्रेणी मंजूरीचा दिनांक | निवड श्रेणी ज्या आदेशान्वये मंजूर झाली त्याचा क्रमांक व दिनंक | निवड श्रेणीत ३ वर्ष सेवा होत असल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| | | | | |

संस्था प्रमुखांची सही व शिक्का